कोषागारातून रोख देय अनुदान
राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जाती उपयोजना (SCSP) या घटकासाठी केंद्र हिश्श्याचे अनुदान वितरीत करण्याबाबत. (लेखाशिर्ष-२२१५ ९८४४).

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र. राग्रापे-२०१६/प्र.क्र.४४/पापु-१०
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, क्राफर्ड मार्केटजवळ, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ०३ मार्च, २०१८

वाचा : १. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-७, दिनांक १७ मार्च, २०१०.
२. केंद्र शासनाचे पत्र क्र.डब्ल्यू-११०२०/२०८/२०१५-वॉटर-१/२६४, दिनांक १७/०३/२०१७
३. केंद्र शासनाचे पत्र क्र.डब्ल्यू-११०२०/२/२०१७-वॉटर-१/२९७, दिनांक २४/०३/२०१७
४. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,यांचे पत्र क्र.पा.व स्व.स.सं./लेखा/०८/ प्र.क्र.-०२/२०१८, दिनांक ०३/०१/२०१८.
५. संचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,पुणे, यांचे पत्र क्र.आवेधन/कक्ष-१/अनुदान मागणी/पं.क्र.४/६७८/२०१७, दिनांक ०९/१०/२०१७.

प्रस्तावना-

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून अनुसूचित जाती उपयोजना या अंतर्गत प्राप्त झालेल्या केंद्र हिश्श्याच्या अनुदानासंदर्भात आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ७८९, अनुसूचित जातींकरीता विशेष घटक योजना, ०१, अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत योजना, (०१) (०१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (अनुसूचित जाती उपयोजना) (केंद्र हिस्सा), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२१५ ९८४४) या लेखाशिर्षाखालील रासायनिक बाधित (केमीकल कन्टॅमिनेशन) या घटकासाठी संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांना व सौर ऊर्जेवरील दुहेरी पंप या घटकासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून उपरोक्त वाचा येथील २) व ३) अन्वये प्राप्त झालेला निधी राज्याच्या एकत्रित निधीत आर्थिक वर्षाच्या अखेरीस दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी जमा झाल्याचे वित्त विभागाने अभिप्राय दिले आहे. सदरचा निधी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अखेरीस प्राप्त झालेला परंतू अखर्चित राहीलेला निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,पुणे व संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांना अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये नळ पाणी पुरवठा योजनांकरीता उपरोक्त घटकांसाठी २२१५ ९८४४ या लेखाशिर्षाखाली रु. ३,५१,२७,०००/- लक्ष (अक्षरी रुपये-तीन कोटी एक्कावन्न लक्ष सत्तावीस हजार मात्र) एवढे अनुदान अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत रासायनिक बाधित (केमीकल कन्टॅमिनेशन) व सौर उर्जेवरील दुहेरी पंप या घटकासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे (BEAMS) पुढील अटींवर मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

अटी:-

(I) संबंधित अंमलबजावणी यंत्रणा यांनी हे अनुदान सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात केवळ अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार ग्रामीण भागातील अनुसूचित जातींचे प्राबल्य असलेल्या (Rural habitations having majority of/Dominated by SC population) भागांमधील नळ पाणी पुरवठा योजनांसंदर्भात रासायनिक बाधित (केमीकल कन्टॅमिनेशन) व सौर उर्जेवरील दुहेरी पंप या घटकासाठी केंद्र शासनाने व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार खर्च करावयाचे आहे.

(II) संबंधित अंमलबजावणी यंत्रणा यांनी या अनुदानातून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.

(III) वरील अटी/शर्तींची संबंधित अंमलबजावणी यंत्रणा यांचेकडून पुर्तता होत आहे याची शासनाला खात्री करुन घेता यावी म्हणून महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर यांना तसेच या विभागातील प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास लेखा परिक्षणाकरीता पुस्तके व लेखे पाहण्याचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम योग्य तऱ्हेने पार पाडता यावे म्हणून यंत्रणा संपूर्ण मदत व सुविधा पुरवतील.

(IV) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र. आरसीएन-१८९/सीआर ३०२७/२८, दिनांक ०५/०९/९० मधील सुचनेप्रमाणे सदर अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित दिनांकांना संबंधित अंमलबजावणी यंत्रणा यांनी विभागीय आयुक्त (विकास शाखा), यांना व कार्यासन पापु-१०/पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करावे. त्याचप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालय, मुंबई/नागपूर व पापु-१० कार्यासनास सादर करावे.

(V) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रासायनिक बाधित (केमीकल कन्टॅमिनेशन) व सौर उर्जेवरील दुहेरी पंप या घटकाखाली हाती घेतलेल्या योजनांसाठीचा खर्च हा ५०% केंद्र निधीतून व ५०% राज्य निधीतून करणे आवश्यक आहे.

(VI) केंद्र व राज्य हिश्श्यातून केलेल्या खर्चाची नोंद न युकता, IMIS या प्रणालीवर पुढीलप्रमाणे घेण्यात यावी तसेच सदर नोंदी पुढीलप्रमाणे वेळोवेळी अद्ययावत करण्यात याव्यात.

क. भौतिक दृष्ट्या १००% पूर्ण परंतू आर्थिक दृष्ट्या अपूर्ण योजना.
ख. > ७५ ते < १००% भौतिक दृष्ट्या पूर्ण.
ग. > ५० ते < ७५% भौतिक दृष्ट्या पूर्ण.
घ. > २५ ते < ५०% भौतिक दृष्ट्या पूर्ण.

(VII) तसेच BDS प्रणालीवर मुक्त केलेली रक्कम संबंधित अंमलबजावणी यंत्रणा यांनी त्वरीत संबंधित कोषागारातून काढण्याची कार्यवाही करावी. कोषागारातून रक्कम वेळीच न काढली गेल्यास तसेच सदर रक्कम या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी न वापरण्यात आल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांची राहील.

(VIII) सर्वप्रथम, राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना यापूर्वी उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीमधून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी करण्यात आलेला सर्व खर्च प्रथम IMIS प्रणालीवर अद्यावत करण्यात यावा. जिल्ह्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार देयक तयार असलेल्या पाणी

पुरवठा योजनांसाठी निधी मागणी असल्याने वितरीत करण्यात आलेला निधी सदर योजनांवरच खर्च करण्यात यावा. तसेच केंद्र हिश्श्यांतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी पाणी पुरवठा योजनांना वितरीत करतांना केंद्र शासनाच्या IMIS संकेतस्थळावर खर्चाची नोंद होत असल्याची खात्री करण्यात यावी.

(IX) सदर निधी सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७, या वर्षाच्या कृती आराखडयात समाविष्ट असलेल्या गावांच्या योजनांसाठीच खर्च करावा. तसेच उपलब्ध करून देण्यात आलेला निधी उपयोगात आणण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून खर्चाचे नियोजन करावे व उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास वेळीच सादर करावीत.

३. केंद्र शासनाकडून रासायनिक बाधित (केमीकल कन्टॅमिनेशन) या घटकांसाठी प्राप्त झालेली एकूण रु. ९१,२७,०००/- एवढी रक्कम आहरण व संवितरण अधिकारी (रोख शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. सदर रक्कम रु. ९१,२७,०००/- (रुपये एक्यानऊ लक्ष सत्तावीस हजार मात्र) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी (श्री. का. जा. धलपे), आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर रक्कम (श्री. का. जा. धलपे) आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करुन ती पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी व तद्नंतर स्वतंत्र धनादेशाद्वारे रक्कम पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी सदर रक्कम केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच राज्य शासनाने या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार खर्च करावी.

४. तसेच सौर उर्जेवरील दुहेरी पंप या घटकासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांना मुक्त करण्यात आलेला निधी रु. २,६०,००,०००/- (अक्षरी रुपये-दोन कोटी साठ लक्ष मात्र) बाबत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे संचालक, (श्री. शेखर गायकवाड) यांच्या स्वाक्षरीने तयार केलेले व उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (श्री.म.भ.सावंत) यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई यांना सादर करण्यात यावे. संचालक, (श्री. शेखर गायकवाड) यांना भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (श्री. म. भ. सावंत) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदरहू रक्कम एनईएफटी (NEFT) प्रणालीद्वारे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या खात्यात जमा करण्यात यावी.

५. यावर होणारा खर्च मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ७८९, अनुसूचित जातींकरीता विशेष घटक योजना, ०१, अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत योजना, (०१) (०१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (अनुसूचित जाती उपयोजना) (केंद्र हिस्सा), ३१ सहाय्य अनुदाने (वेतनेत्तर) (२२१५ ९८४४) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक ३०.०६.२०१७ अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर प्रकरणी वित्त विभाग परिपत्रक दिनांक १८.०४.२०१७ मधील अनुक्रमांक ७ ते १८ मधील अटींची तसेच सदर

परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १ ते ८ व क्र. ८ मधील तपासणी सूचीतील अनुक्रमांक १ ते १० मधील अटींची पुर्तता होत आहे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक क्र. १४५/व्यय-३, दिनांक २०.०४.२०१७ व क्र. १६४/व्यय-१८, दिनांक ०२.०५.२०१७ च्या मान्यतेने व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०३०३१४२४३८३०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deelip Pandurang Patil

Digitally signed by Deelip Pandurang Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3810fd2c32f3841df60ca68a27ae50fdbc9fd6c506fd334325871d684bf3eef9, cn=Deelip Pandurang Patil
Date: 2018.03.03 14:04:58 +05'30'

(दिलीप पां.पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
४. नियोजन विभाग (कार्यासन-१४४३)/वित्त विभाग (व्यय-३), मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विभागीय आयुक्त,
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे.
८. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
९. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) सर्व जिल्हा परिषदां
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/पुणे
११. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे
१२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कार्यासने क्र. पापु-०४, पापु-२०.
१३. निवडनस्ती/पापु-१०.

परिशिष्ट-अ

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.राग्रापे-२०१६/प्र.क्र.४४ /पापु-१०,
दिनांक: ०३ मार्च, २०१८ चे सहपत्र

ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी निधी वितरण (केंद्र हिस्सा) (अनुसूचित जाती उपयोजना) (SCSP)
लेखाशिर्ष-२२१५ ९८४४)

(रुपये लाखात)

अ.क्र.	अंमजबजावणी यंत्रणेचे नाव	घटक	वितरीत रक्कम
१.	२.	३.	४.
१	पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था	रासायनिक बाधित (केमीकल कन्टॅमिनेशन)	९१.२७
२	भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा	सौर ऊर्जेवरील दुहेरी पंप	२६०.००
	एकूण रुपये तीन कोटी एक्कावन लक्ष सत्तावीस हजार फक्त)		३५१.२७

Deelip Pandurang Patil

Digitally signed by Deelip Pandurang Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3810fd2c32f3841df60ca68a27ae50fdbc9fd6c506fd334325871d684bf3eef9, cn=Deelip Pandurang Patil
Date: 2018.03.03 14:06:30 +05'30'

(दिलीप पां.पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन